


दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET




Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७२ ■ गुरूवार, दि. १ मे २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -72 ■ Thursday, 1 May 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


# प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महाराष्ट्र दिन, कामगार दिनाच्या शुभेच्छा...

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून, आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून, सहकार्यातून आणखी प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

यानिमित्ताने मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आदी सर्व महान समाजसुधारकांना विनम्र अभिवादन केले आहे. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, ङ्गमहाराष्ट्राची स्थापना ज्यांच्या बलिदानातून सत्यात आली त्या सर्व हुतात्म्यांना विनम्र आदरांजली अर्पण करतो. महाराष्ट्राने आपले थोरपण देशाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रगतीमध्ये महत्वाचे योगदान देत सिद्ध केले आहे. महाराष्ट्राने गेल्या ६५ वर्षात उद्योग, शिक्षण, आरोग्य, कृषी, कला, क्रीडा ,साहित्य ,सामाजिक न्याय अशा अनेक क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे.



मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी साहित्य हा आपल्या अस्मितेचा आत्मा आहे. ही ओळख जपणे आणि पुढच्या पिढीकडे पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. महाराष्ट्र शुरवीर नरोत्तमांची पावनभूमी आहे. तशीच ती समाजसुधारकांची आणि स्वातंत्र्ययोद्ध्यांची आहे. या राज्याला ज्ञान ,वैराग्य, सामर्थ्य, त्याग, प्रतिभा आणि कला या सद्गुणांचे अलौकिक कोंदण लाभले आहे.

सामाजिक प्रबोधनाचा लाभलेला वारसा, राज्यात नांदणारी शांतता, कायदा सुव्यवस्था , नैसर्गिक साधनांचा सदुपयोग करण्याचे नियोजन, प्रतिभावंत नागरिक आणि कष्ट करण्याची तयारी असणारी युवा पिढी यामुळे जागतिक पातळीवर महाराष्ट्राने आपली ओळख निर्माण केली आहे. या सगळ्याच्या पाठबळावर आणि सर्वांच्या सहकार्याने सुरक्षित, सुसंपन्न राज्य घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. येत्या काळात महाराष्ट्र हे देशातीलच नाही तर जगातील प्रगत राज्य असेल हा आपला संकल्प आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे.

कामगार दिनाच्या निमित्तानेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्याच्या प्रगतीत कामगारांचे म ोलाचे योगदान असल्याचे अधोरेखित करून, महाराष्ट्राच्या औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक विकासात कामगार वर्गाची भूमिका अत्यंत म हत्त्वाची आहे. त्यांच्या कल्याणासाठी आणि अधिकार संरक्षणासाठी सरकार कटिबद्ध आहे, असेही म्हटले आहे.

# शेतकऱ्यांनी आयुष्य संपवलं नसून सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेली हत्या आहे

**परभणी :** सोयाबीनला हमीभावाप्रमाणे ४८०० रुपये एवढा भाव मिळाला पाहिजे होता. नुकत्याच झालेल्या निवडणुकांपूर्वी याच महायुती सरकारने हमीभावापेक्षा २० टक्के जास्त अनुदान शेतकऱ्यांना देऊ असा वायदा केला होता. सरकारच्या म्हणण्यानुसार सोयाबीनला सहा हजार रुपये भाव मिळायला हवा होता. पण प्रत्यक्षामध्ये ३२०० ते ३५०० पर्यंतच सोयाबीनला भाव मि ळाला. त्यामुळे तब्बल अडीच हजार रुपये प्रति क्विंटल नुकसान सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावे लागले. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी ६५ लाख टन सोयाबीन विक्री केली आहे. प्रतिक्विंटल अडीच हजार प्रमाणे तब्बल १८ हजार कोटी रुपयांचं नुकसान या सरकारने महाराष्ट्रातल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचं केलं आहे. केवळ हमीभावाचा कायदा न केल्याने महाराष्ट्रातला शेतकरी देशोधडीला लागला आहे आणि त्यामुळेच शेतकरी आत्महत्या करत आहेत. महाराष्ट्रात दररोज सहा शेतकरी आत्महत्या करत आहेत, या आत्महत्या नसून सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झालेल्या हत्या असल्याचं, माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले.



**राजू शेट्टींचा सरकारवर घणाघात**

परभणी जिल्ह्यातील मान्सूना येथील भगवानराव टेकाळे आणि सचिन जाधव आणि ज्योती जाधव या शेतकरी दांपत्यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली होती. या आत्म हत्याग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करण्यासाठी आणि संपूर्ण शेतकरी कर्जमुक्तीसाठी आज माळसोन्ना येथून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आक्रोश पदयात्रा काढण्यात आली. यावेळी त्यांच्यासोबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले की, सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांनी काढलेलं कर्ज देखील फेडता येत नाही. निरोपोदी सारखं कर्ज बुडवण्याची या शेतकऱ्यांची इच्छा नाही. हा शेतकरी स्वतःचा जीव देईल पण कर्ज मात्र बुडवत नाही. त्यामुळे ज्यांनी या शेतकऱ्यांना आश्वासनं दिली आणि ती पूर्ण केली नाही त्यांच्या या चुकीच्या आश्वासनामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागली. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी आत्महत्याग्रस्त झाला. अशांवर आता ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करावा, अशी मागणी देखील यावेळी राजू शेट्टी यांनी केली आहे. केंद्र सरकारचा नुकताच अहवाल प्राप्त झाला आहे. त्या अहवालानुसार महाराष्ट्रातील शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती ही भूमिहीन शेतमजुरापेक्षा हालाखीची झाली आहे. शेतमजुरापेक्षा देखील शेतकऱ्याचं उत्पन्न कमी झालेलं आहे आणि त्यामुळेच या शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे. म्हणूनच ही सत्य परिस्थिती सरकारला अवगत करून देण्यासाठी आम्ही आत्मक्लेष पदयात्रा काढत आहोत.

# मनोज जरांगे हा अतिशय येडपट, खुळचट, बावळट माणूस - लक्ष्मण हाके

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे मागील काही दिवसांपासून मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषणाला बसताना दिसले. आता त्यांनी सरकारला परत एकदा मोठा इशारा दिलाय. २९ ऑगस्ट २०२५ पासून मुंबईत ते आमरण उपोषणाला सुरूवात करणार आहेत, त्याबद्दलची घोषणा त्यांनी केलीय. मात्र, दुसरीकडे ओबीसींमधून मराठा समाजाला आरक्षण देण्यास ओबीसी समाज विरोध करतंय. ज्यादिवशी मनोज जरांगे हे उपोषणाला बसणार त्याच दिवशी महाराष्ट्राते ओबीसी मुंबईकडे निघणार असल्याचे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.



लक्ष्मण हाके म्हणाले की, मनोज जरांगे हा अतिशय येडपट, खुळचट, बावळट माणूस आहे. सत्तेची झूल बाजूला सारून ज्या माणसांनी तुम्हाला निवडून दिले त्यांचा प्रश्न सभागृहात उचलला पाहिजे, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी ओबीसी आमदारांवर टीका केली. एका पेपर एक लेख आला आहे की, शिंदे समितीची माहिती आली. हे खरं असेल तर महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण संपले आहे. ही माहिती मी महाराष्ट्रातील ओबीसी नेते यांना सांगत आहे. आठ लाख प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहेत. ज्या ओबीसी जाती आजही अलिप्त आहेत. ते आता राजकीय व्यवस्थामध्ये दिसणार नाही. ओबीसी आरक्षण कसं वाचणार आहे हे मुख्यमंत्री आणि ओबीसी नेत्यांनी सांगितलं पाहिजे अशी आमची मागणी आहे. ओबीसी घटनात्मक चौकट

# मुलीवर अत्याचार प्रकरणात वडिलांची निर्दोष मुक्तता, पण पत्नीने साक्ष दिल्याचा राग; महिलेला संपवलं

**नांदेड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुलीच्या अत्याचार प्रकरणी जन्म ठेपाची शिक्षा भोगत असलेल्या नराधम पित्याची उच्च न्यायालयातून निर्दोष मुक्तता झाली. पण या प्रकरणात साक्ष का दिली असा सवाल करत नराधमाने आपल्याच पत्नीचा खून केला. मन हेलावून लावणारी घटना जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील सावरगाव येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून मारोती जाधव टिकेकर असं आरोपीचं नाव आहे.

नेमकं काय घडलं?

२०१९ साली आरोपी मारोती टिकेकर याने आपल्याच पोटच्या मुलीवर अत्याचार केला होता. या प्रकरणी नराधम पित्या विरोधात भोकर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. घटनेची गांभीर्य ओळखत भोकर पोलिसांनी ४८ दिवसात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलं. न्यायालयाने २८ नोव्हेंबर २०१९ साली आरोपीला जन्मठेपाची शिक्षा सुनावली. आरोपीने शिक्षा भोगली. दरम्यान या



प्रकरणी फेब्रुवारी २०२५ मध्ये आरोपीची उच्च न्यायालयातून निर्दोष मुक्तता झाली. कारागृहातून सुटका झाल्यानंतर आरोपी म ारोती हा आपल्या पत्नीसोबत राहत होता. मात्र पत्नीने आपल्या विरोधात साक्ष का दिली याचा राग त्याच्या मनात होता. याच कारणावरून तो पत्नी सुरेखासोबत वाद घालायचा.

डोंगराळ भागात पत्नीची हत्या -

२६ एप्रिल रोजी आरोपी मारोती याने लाकडं आणण्याचा बहाणा करून पत्नी सुरेखा हिला भोकर बायपास रोडवरील तलावालगत असलेल्या डोंगराळ भागात नेलं. त्यानंतर तिथेच त्याने दगडाने ठेचून पत्नीचा खून केला.

दुसरीकडे भोकर पोलीस ठाण्यात मीसिंग दाखल करण्यात आली होती. पोलीस महिलेचा शोध घेत असताना भोकर बायपास रोडवरील एका डोंगराळ भागात महिलेचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांच्या कसून चौकशीत आरोपीची कबुली -

दरम्यान, पोलिसांना घटनास्थळी एक मानवी अर्धवट कवटी, हात, डोक्याचे केस, पायातील पैंजन, जोडवे, चप्पल, साडी आणि इतर साहित्य आढळून आलं. सापडलेल्या वस्तूवरून पोलिसांनी तपास सुरी केला.

'फरार असलेल्या महिलेचा पती नांदेड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकातून असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन आरोपी मारोती याला अटक केली. मुलीच्या अत्याचार प्रकरणात साक्ष दिल्याच्या कारणावरुन त्याने पत्नीचा खून केल्याची कबुली आरोपी पतीने दिली. या घटनेने भोकर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

# जातनिहाय जनगणनेचा निर्णय क्रांतिकारी ठरेल - मंत्री अतुल सावे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय हा ओबीसी व वंचित घटकांच्या दृष्टीने क्रांतिकारी ठरेल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे आभार मानले आहे.



केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांच्यासाठी धोरण व योजना आखण्यात मदत होणार असून, स्वतंत्र निधी नियोजन करण्यासही आधार मिळणार आहे. अनुसूचित जाती व जमातीप्रमाणे आता इतर मागास प्रवर्गालाही शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा अशा मूलभूत सुविधांचा लाभ होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री सावे म्हणाले की, या घटकांना खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रवाहात सामील होता येणार आहे. या निर्णयाबद्दल मंत्री सावे यांनी केंद्र सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही आभार मानले आहेत.

# पाकिस्तान सिनेइंडस्ट्रीला भारताचा मोठा दणका, माहिरा खान, अली जफर यांच्यासह अनेक कलाकारांच्या इन्स्टाग्राम अकाऊंट्सवर बंदी

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

काश्मीरमधील पहलगाम इथं झालेल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारनं पाकिस्तान विरोधात अनेक निर्णय घेतले आहेत. तसंच पाकिस्तानी कलाकारांवरही आता पूर्णपणे बंदी घातली जात आहे. पाकिस्तानी कलाकारांचा सिनेमा यापूर्वीच बॅन करण्यात आला आहे. आत पाकिस्तानी अभिनेत्रींचे सोशल मीडिया अकाऊंट्सवरही भारतात बंदी घालण्यात आली आहे.



या कलाकारांच्या इन्स्टाग्राम अकाऊंट्सवर बंदी

बॉलिवूड सिनेमात भूमिका साकारलेली माहिरा खान हिचं इन्स्टाग्राम अकाऊंटही आता भारतात दिसणार नाहीये. तिच्यासोबतच हानिया आमिर , आयजा खान, इकरा अजीज यांचे इन्स्टाग्राम अकाऊंट्सवरही बंदी घातल्याचं पाहायला मिळतंय. यांचे अकाऊंट्स ओपन केल्यानंतर हे अकाऊंट्स भारतात उपलब्ध नसल्याचा मेसेज दिसतो. तर अभिनेता अली जाफर याचं इन्स्टाग्राम अकाऊंटही आता भारतात दिसणार नाहीये. अभिनेता फवाद खानच्या अकाऊंट मात्र अद्याप दिसत आहे. पाकिस्तानी कलाकारांचे भारतही आहेत फॉलोअर्स

खरं तर कलेला धर्म नसतो, असं म्हटलं जातं. जशी भारतीय कलाकारांची पाकिस्तानात क्रेझ पाहायला मिळते. तसंच काही पाकिस्तानी कलाकार, पाकिस्तानी सिनेमे, पाकिस्तानी टीव्हीशो, वेब सीरिज भारतात चर्चेत असायचे. सोशल मीडियावर याचे व्हिडिओ व्हायरल व्हायचे. पण आत यावर बंदी घालण्यात आली आहेत.

# किल्ले शिवनेरीवर १५ ते २० शेतकऱ्यांवर मधमाशांचा हल्ला; शिवाई देवीचा अभिषेक सुरु असताना घटना

**जुन्नर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जुन्नरच्या शिवाई देवी यात्रेच्या औचित्याने किल्ले शिवनेरीवर बुधवारी शिवाई देवीच्या अभिषेकाचा सोहळा सुरू असतानाच, शिवाई देवी मंदिराबाहेरील किल्ले मार्गावर लातूर येथून आलेल्या १५ ते २० शेतकऱ्यांवर मधमाशांनी हल्ला चढवला. काही मधमाशांनी मंदिरातील भाविकांनी चावा घेतला. गेल्या काही महिन्यांत शिवनेरीवर मधमाशांकडून हल्ल्याची ही चौथी घटना आहे.

माशांपासून बचाव करण्यासाठी शेतकरी गळ्यातील उपरण्यांनी माशांना झटकत, शिवाई देवीच्या मूळ मंदिराच्या दिशेने पळत सुटले.

त्या वेळी मंदिराजवळ दर्शनासाठी गेलेले पत्रकार धर्मेंद्र कोरे आणि त्यांच्या पत्नी मनीषा कोरे यांनी शेतकऱ्यांना हालचाल करू नका, उपरणी झटकू नका, असे सांगितले; परंतु हे शेतकरी काही न ऐकता पळतच राहिले. पुढे रस्त्याचा मार्ग बंद असल्याने हे शेतकरी पुन्हा माघारी फिरून मंदिराच्या दिशेने पळाले.

मंदिराबाहेर मधमाशांच्या झुंडी फिरत होत्या. काही माशा मंदिरात घुसल्याने चार ते पाच भाविकांनाही त्यांनी लक्ष्य केले. जुन्नर रेस्क्यू टीमचे समन्वयक रूपेश जगताप, राजकुमार चव्हाण, सुजल बिडवई, ओम बिडवई; तसेच पुरातत्व खात्याचे कर्मचारी गोकुळ दाभाडे यांनी कोरे यांच्यासह जखमींना सरकारी रुग्णालयात दाखल केले. बेशिस्त वर्तन टाळा'गडावर आलेल्या लातूरच्या शेतकऱ्यांच्या समूहाने उपरणी झटकून माशांचा प्रतिकार करण्याचा प्रकार केला. त्याम ुळे माशा उद्विग्न झाल्या आणि प्रतिहल्ला परतवताना माशांनी उग्र रूप धारण केले. पर्यटकांनी अशा घटनेत शिस्त पाळली, तर माशांचा हल्ला रोखता येणे शक्य आहे,' असे सह्याद्री गिरीभ्रमण संस्थेचे अध्यक्ष राहुल जोशी यांनी सांगितले.

## महाराष्ट्राचे देशातील स्थान आणि महत्त्व वाढणार

'जय जय महाराष्ट्र माझा' हे केवळ महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानेच आळवायचे नव्हे तर नागरिकांच्या मनात सतत अभिमान जागवणारे गीत आहे. आता तर हे आपले राज्य गीत आहे. त्यामुळेच त्याचा नाद घुमवत यंदाचा महाराष्ट्र दिन साजरा करताना राज्याप्रती प्रेम दाटून येणे स्वाभाविक आहेच, पण त्याबरोबरच सध्या सत्तेसाठी पाहायला मिळणारी खेचाखेचीही दुर्लक्षित करण्याजोगी नाही. अलीकडच्या काळामध्ये राज्यात विस्तारणारे रस्त्यांचे जाळे, पायाभूत सुविधांमध्ये बघायला मिळणारे मोठे बदल तसेच रेल्वे यंत्रणेतील सुधारणा आणि त्यातील अद्ययावतता या सर्वांमुळेच महाराष्ट्राचे देशातील स्थान आणि महत्त्व वाढणार आहे, यात शंका नाही. मात्र असे असतानाही राज्याने काही क्षेत्रांकडे अधिक लक्ष देण्याची गरज लक्षात घ्यायला हवी. गेल्या काही वर्षांमध्ये उद्योजकांनी महाराष्ट्रातले वीजदर आणि अन्य राज्यांमधले वीजदर यांच्या तुलनेकडे वारंवार लक्ष वेधले; परंतु त्यावर राज्यकर्त्यांनीही काहीच निर्णय घेतला नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या सीमाभागातल्या काही उद्योजकांनी शेजारच्या राज्यात जाणे पसंत केले. अलीकडेच काही मोठे उद्योग राज्याबाहेर गेल्यामुळे उडालेली टीकेची राळ आपण पाहिली. महाराष्ट्रात उद्योग, शेती आणि अन्य घटकांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला. त्यामुळे बिहार, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आदी राज्यांमधून स्थलांतरित मजूर आणि कामगार मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात आले आणि महाराष्ट्रात सर्वाधिक नागरीकरण झाले. मात्र नागरीकरणाचे फायदे आहेत तसेच तोटेही आहेत.

स्थलांतरितांचे लोंढे वाढतच असल्यामुळे आता केवळ मुंबईमध्येच नव्हे तर राज्यातील बऱ्याच शहरांमधील प्रश्न बिकट बनत आहेत. एकट्या मुंबईत सुमारे ६५ लाख लोक झोपडपट्टीत राहतात. त्यामुळेच यापुढील काळात या प्रश्नावर काम करण्याची गरज लक्षात घ्यायला हवी. सहकार क्षेत्र हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य मानले जाते. ग्रामीण अर्थकारण आणि विकासात सहकाराचे योगदान मोठे होते. काही सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्यांमध्ये गैरव्यवहार झाले; नाही असे नाही. परंतु नंतर सहकारातले राजकारण, नेत्यांची कुरघोडी, कच्च्या मालाचा तुटवडा आणि जागतिक परिस्थिती तर कधी अधिकचे उत्पादन यामुळेही सहकारी साखर कारखानदारी अडचणीत आली. सूतगिरण्यांचेही थोडेफार तसेच झाले. महाराष्ट्रात नागरी बँका आणि पतसंस्थांचे प्रमाण जास्त आहे. त्यांनीही ग्रामीण विकासाला हातभार लावला; परंतु सहकाराच्या गळ्याला नख लावून खासगी संस्थांना पायघड्या घालण्याचे धोरण राज्याच्या विकासाला मारक ठरत गेले. आवश्यकतेपेक्षा जास्त साखर कारखाने, त्यांच्यातली गळेकापू स्पर्धा, राजकारण यामुळे सहकारी साखर कारखानदारी अडचणीत आली आणि खासगी कारखानदारीने सहकारी साखर कारखानदारीपुढे आव्हान निर्माण केले. महाराष्ट्रातल्या शेतीविकासाचा दर चांगला होता. फलोद्यानाची योजना महाराष्ट्राने देशाला दिली. शेतीमालावर प्रक्रिया करण्याचे अनेक उद्योग उभे राहिले; परंतु हजारो कोटी रुपये खर्चूनही महाराष्ट्रातले सिंचनाखालचे क्षेत्र किती वाढले, हे समोर आलेले नाही. महाराष्ट्रातल्या अनेक शेतकऱ्यांनाच आता शेती करावी, असे वाटत नाही. त्याला कारणीभूत आहे. शेतीमालाचा भाव. महाराष्ट्राची एकरी उत्पादकता घटली. काही काळ महाराष्ट्राचा कृषी उत्पादनाचा दर शून्य टक्क्यावर आला होता. शेजारच्या मध्यप्रदेशचा शेती विकासदर दहा टक्क्यांहून अधिक होता. हे इथे लक्षात घ्यायला हवे. बिहारसारख्या राज्याचा शेतीविकासाचा दर महाराष्ट्रापेक्षा जास्त होता, हे महाराष्ट्राच्या चांगल्या प्रकृतीचे लक्षण नक्कीच नाही. महाराष्ट्रातली शेती अडचणीत आल्याने आणि दुष्काळ, अवकाळी, गारपीट वा अन्य आपत्तींमुळे शेतीतला मजूर, शेतकरी आता शहरांकडे धाव घ्यायला लागला आहे. साहजिकच शहरांवरचा ताण वाढत चालला आहे. दुसरीकडे, अन्य राज्ये शेतीमध्ये प्रगती करत आहेत. महाराष्ट्राशी त्यांची स्पर्धा वाढली आहे. महाराष्ट्र मात्र मागे पडत चालला आहे. शेतीत प्रगती झाली तर शहरांकडचा लोंढा थांबतो; परंतु महाराष्ट्रात तसे झाले नाही. महाराष्ट्रात पाणीवाटपाचा प्राधान्यक्रमही वादाचा विषय झाला. पिण्याच्या पाण्याला पहिला क्रम असणे स्वाभाविक आहे; परंतु शेतीसाठी बांधल्या गेलेल्या धरणातले सर्व पाणी पिण्यासाठी वापरले जायला लागले. हे टाळण्यासाठी पिण्यासाठी स्वतंत्र धरणे बांधण्याची आवश्यकता होती. पण त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. शेतीची दुरवस्था झाली. परिणामी, उद्योग, सेवा क्षेत्र, रोजगार अशा सर्वच आघाड्यांवर राज्याची घसरण बघायला मिळते. राज्यकर्त्यांनी ही घसरण तातडीने रोखणे गरजेचे आहे. देशातल्या इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात बेरोजगारीचे प्रमाण खूपच जास्त आहे. हरयाणा, कर्नाटक, तेलंगणा आणि तमिळनाडू या राज्यांमधल्या नागरिकांचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. राज्याच्या डोक्यावरचा कर्जभारही वाढता आहे. एकीकडे आपण राज्याला पुरोगामित्वाचा वारसा असल्याचे सांगतो, दुसरीकडे राज्यात महिला अत्याचारांच्या घटना वाढत आहेत. अपहरण, अत्याचार आणि शोषण या स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्येही वाढ झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. उद्योग, वीजनिर्मिती, सिंचन व्यवस्था, शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा अशा विविध आघाड्यांवर

असमतोलातून संघर्ष सुरू झाल्याची वारंवार बघायला मिळणारी स्थितीही फारशी आशादायी नाही. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने ही परिस्थिती बदलण्याचा संकल्प सोडण्याची गरज आहे. त्यासाठी राज्याची कर्ज घेण्याची मर्यादा वाढवणे आणि अधिक कर्ज घेणे हे एक धोरण असू शकते; मात्र केवळ उधारीच्या माध्यमातून संपूर्ण उणीव भरून काढल्यास, राज्य कर्जाच्या खाईत ढकलले जाईल, हेदेखील सत्य आहे. सार्वजनिक खर्च कमी करणे हा यावर एक पर्याय असू शकतो; परंतु हे धोरण तणावातल्या अर्थव्यवस्थेसाठी प्रतिकूल असू शकेल. प्रत्यक्षात सार्वजनिक आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण तसेच इतर सार्वजनिक सेवा क्षेत्रात अतिरिक्त खर्चाची आवश्यकता निर्माण होणार आहे. केंद्र सरकारने दिलेल्या एनएसएसएफ अर्थात राष्ट्रीय अल्पबचत निधी कर्जाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य दर वर्षी साडेदहा हजार कोटी रुपयांची किंवा त्यापेक्षा जास्त परतफेड करते. हे लक्षात घेता राज्यांनी कर्ज घेण्यापेक्षा केंद्र सरकारने कर्ज घेणे अधिक कार्यक्षम आणि रास्त होईल. सध्या अनेक व्यवसाय अडचणीत आहेत. एकीकडे कोरोनामुळे झालेले नुकसान भरुन येण्यास विलंब लागत असताना दुसरीकडे पुन्हा एकदा कोरोनारुग्णांची संख्या वाढू लागल्यामुळे लोकांमध्ये धास्ती दिसत आहे. काही व्यवसायांची संख्या रोडावल्याने अनेकजणांच्या गेलेल्या नोकऱ्या परत मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. ही स्थिती जागेवर आणण्यासाठी त्यांना वैकल्पिक रोजगारासाठी पुन्हा पैसे द्यावे लागतील आणि वैकल्पिक व्यवसायांना सक्रिय प्रोत्साहन द्यावे लागेल. ई-कॉमर्स आणि तत्सम तंत्रांद्वारे शासनाने व्यवसायांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आगामी काळात कोरोनासारखे साथीचे आजार बळावण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. देशातील तसेच राज्यातील वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता आता त्याबाबतही खंबीर निर्णय घेण्याची आणि ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

# महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी

१ मे हा महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिन. याच दिवशी १९६० साली तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. पंडितजींनी यशवंतराव चव्हाण यांच्या हाती महाराष्ट्राचा मंगलकलश दिला आणि नव्या महाराष्ट्राच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविली. तसा महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात महाराष्ट्राने हिरीरीने सहभाग घेतला आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासातही योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा धार्मिक सुधारणांचा, सामाजिक सुधारणांचा इतिहास प्रेरणादायी आहे. राज्याचे विविधांगी भावविश्वब थक्क करणारे आहे.

महात्मा गांधीजींनी महाराष्ट्र म्हणजे कार्यकर्त्यांचे मोहोळ अशा शब्दांत महाराष्ट्राची प्रशंसा केली. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महान कवयित्री महादेवी वर्मांनी महाराष्ट्र हा भारताच्या सिंहद्वाराचा प्रहरी आहे, अशा शब्दात गौरव केला. महाराष्ट्र ही संत-महंत, ऋषि-मुनींची जशी भूमी आहे तशीच शूरवीरांचीही आहे. या भूमीला पराक्रमाची, त्यागाची, देशप्रेमाची परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवरायांनी सर्वधर्मसमभावाचे पालन केले. हिंदवी स्वराज्य, रयतेचे राज्य स्थापन केले. छत्रपती शिवरायांपासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राजगुरु, नाना पाटील यासारख्या अनेक देशभक्तांनी इंग्रजांविरुध्द लढा उभारला. अतोनात कष्ट, यातना सहन केल्या. त्यासाठी प्राणांचीही पर्वा केली नाही.

संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वार, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत तुकाराम, समर्थ रामदास, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संत नरहरी सोनार, सेना महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्र मनाचे संवर्धन, पोषण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी समाज प्रबोधनासाठी अपार कष्ट घेतले.

देशाच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पहात असतांनाच द्विभाषिक राज्याचे एक शक्तीशाली राज्य व्हावे यासाठी लोकनेते, बुध्दीवादी, लेखक, पत्रकार यांनी मराठी भाषिक प्रदेशएकत्र आणण्याची कल्पना मांडली. एस.एम.जोशी, आचार्य प्र.के. अत्रे, कॉ.श्रीपाद अमृत डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक जण नवमहाराष्ट्रासाठी एक झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार केले.




महाराष्ट्राच्या मातीचे गुणवर्णन अनेक प्रतिभावंतांनी, इतिहासकारांनी करुन ठेवले आहे. महाराष्ट्राचे महात्म्य वर्णन करतांना राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज यांनी मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा। प्रणाम घ्यावा माझा हा, श्री महाराष्ट्र देशा, राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा । नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा । अशा शैलीदार ओळी वापरल्या आहेत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीही बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा हे महाराष्ट्र गीत लिहून महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे. वि.वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांनी 'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा, हिच्या संगाने जागल्या द-याखो-यातील शिळा अशा शब्दांत स्वाभिमान जागवला आहे. वसंत बापटांनीही भव्य हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा, गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा म्हणत महाराष्ट्रप्रेम व्यक्त केले आहे. विदर्भ, कुंतल, अश्मक, लाट, अपरान्त अशा विविध नावांनी एकवटलेला मरहट्ट देश म्हणजेच महाराष्ट्र होय. श्री चक्रधर स्वामी तसेच महानुभव कवींनी महाराष्ट्राचे विस्तृत वर्णन केले आहे. समर्थ रामदास स्वामींनी मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा हे प्रेरणादायी सूत्र मांडले. संत ज्ञानेश्वररांनी माझा मऱ्हाचि बोल कवतुके। परी अमृतातेंहि पैजा जिंके। ऐसी अक्षरेरसिकें । मेळवीन अशा शब्दांत मराठीचे माधुर्य मांडले आहे. मा.त्र्यं.पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन यांनी मराठी असे आमुची मायबोली म्हणत भाषेची थोरवी वर्णिली आहे. गं.रा.मोगरे यांनी माता तशी स्वभाषा, सेवाया होय आपणा उचित। किंबहुना मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित म्हणून भाषेचा गौरव केला आहे. ना.के.बेहेरे यांनी भाषा आमुची छान। मराठी। भाषा आमुची छानभाषा भिन्ना देशदेशच्या सर्वांची परि खाण म्हणून मराठीचे श्रेष्ठत्व सांगितले. संत एकनाथ महाराजांनी संस्कृत वाणी देवे केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ? असा परखड प्रश्न विचारला आहे. ख्रिस्तदास स्टीफन यांनी जैसी हरळां (खडा) माजि रत्नकिळा। कि रत्ना माजि हिरानिळा। तैसी भासां माजि चोखाळ। भासा मराठी या शब्दांत मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त केला आहे. ना.गो.नांदापूरकर यांनी माझी मराठी असे मायभाषा हिच्या कीर्तिचे तेज लोकी चढे, गोडी न राहे सुधेमाजि आता, पळाली सुधा स्वर्गलोकांकडे अशा रसदार शब्दांत मराठीचा गोडवा गायिला आहे.

महाराष्ट्राने आतापर्यंत साहित्य, कला, शिक्षण, क्रीडा, संस्कृती, नाट्य, चित्रपट, संगीत, सहकार, कृषी, उद्योग, संगणक, विज्ञान अशा विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. आपल्या पूर्वजांनी दिलेल्या योगदानाची जाणीव ठेवत वैभवशाली इतिहास जपत प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धारआपण करावयास हवा.

## १ मे महाराष्ट्र दिन म्हणून का साजरा होतो?

महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र ही तीच भूमी आहे जिच्या कुशीत अनेक महान व्यक्तिमत्त्वे जन्माला आलेली आहेत. ज्ञानेश्वर महाराजांपासून तुकोबांपर्यंत, छत्रपती शिवाजी महाराजांपासून संभाजी महाराजांपर्यंत सगळेच या महाराष्ट्राच्या कुशीत जन्माला आलेले आहेत. मराठी माणसासाठी हा दिवस म्हणजे मोठा उत्सवच असतो.

१ मे महाराष्ट्र दिन म्हणून का साजरा होतो? –

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले. मात्र, महाराष्ट्र स्वतंत्र नव्हता! भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशाचा नकाशा पूर्णपणे वेगळा होता. पुढे हळूहळू देशातील राज्ये भाषा आणि प्रदेशाच्या आधारावर वेगळी झाली. त्यानुसार १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून साजरा केला जातो.

जेव्हा इंग्रजांकडून भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशाची प्रादेशिक घटना खूप वेगळी होती. शेकडो राज्ये एकवटली गेली आणि देशाच्या कारभारासाठी राज्य व्यवस्था स्थापन करावी लागली. १९५६ मध्ये, राज्य पुनर्गठन अधिनियमाने भाषेच्या आधारे भारतातील राज्यांच्या मर्यादा निश्चित केल्या. आज बरीच नवीन राज्ये आपल्या परिचयाची आहेत, पण त्यांत मराठी, गुजराती, कच्छी आणि कोंकणी अशा भाषिक गटांचा समावेश असलेल्या मुंबई राज्यासारख्या विसंगती निर्माण झाल्या. या मतभेदांमुळे बॉम्बे स्टेटला दोन राज्यांत विभागण्यासाठी एक चळवळ उभी राहिली, एक म्हणजे जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरे जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोंकणी बोलतात.

## महाराष्ट्राची निर्मिती कशी झाली? -

**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक प्रांतीय राज्ये मुंबई प्रांतात विलीन करण्यात आली. त्या वेळी मुंबई प्रांतात गुजराती आणि मराठी भाषा बोलणारे लोक राहत होते. त्याच वेळी भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली. गुजराती भाषिकांना स्वत:चे वेगळे राज्य हवे होते. त्याच वेळी मराठी भाषिक नागरिकही स्वतंत्र राज्याची मागणी करत होते. या मागणीसाठी अनेक आंदोलने झाली. या आंदोलनांचा परिणाम म्हणून १९६० मध्ये मुंबई पुनर्रचना कायद्याअंतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्र आणि गुजरात ही राज्ये २५ एप्रिल १९६० रोजी संसदेतर्फे लागू करण्यात आलेल्या बॉम्बे पुनर्गठन अधिनियम १९६० नुसार अस्तित्वात आली. हा कायदा १ मे १९६० रोजी अमलात आला. बॉम्बे पुनर्गठन अधिनियमांतर्गत महाराष्ट्र आणि गुजरात विभागले गेले आणि दोन्ही स्वतंत्र राज्ये झाली.**

# संयुक्त महाराष्ट्र समिती चळवळ

**स्वतंत्र** भारतात मराठी भाषकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा लढा उभारला गेला. या चळवळीमुळे १ मे इ. स. १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा बोलणारे मुंबई, कोकण, देश, विदर्भ, मराठवाडा, खानदेश व अजूनही महाराष्ट्राबाहेरच असलेले डांग, बेळगाव, निपाणी, कारवार व बिदर हे भाग अभिप्रेत होते. साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय या सर्व अंगानी ही चळवळ उभी राहिली.

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभारासाठी भारताची विभागणी वेगवेगळ्या प्रांतात केली होती परंतु ती भाषेप्रमाणे नव्हती. इ. स. १९२० रोजी नागपुरात झालेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी भाषावर प्रांतरचेनेचा मुद्दा महात्मा गांधींनी मान्य केला होता. लोकमान्य टिळक हे देखील भाषावर प्रांतरचनेच्या बाजूने होते. काँग्रेसनेच एकेकाळी मान्य केलेला हा मुद्दा स्वातंत्र्यानंतर मात्र पक्षाला, विशेषतः नेहरुंना, संकुचित व राष्ट्रीय एकात्मकतेला धोका वाटू लागला. मुंबईतील भांडवलदारांना जे मुख्यत: अमहाराष्ट्रीय होते. त्यांचा मुंबई महाराष्ट्राला द्यायला कडाडून विरोध होता.

इ. स. १९३८ रोजी पटवर्धन संदर्भ हवा व इ. स. १९४० मध्ये ग.त्र्यं. माडखोलकरांनी महाराष्ट्र एकीकरणाचा विषय उपस्थित केला. संदर्भ हवा. माडखोलकरांनी महाराष्ट्र समाजात व्यापार व उद्योग भूमिपुत्रांच्या ताब्यात नसल्याचं व महाराष्ट्राचे काँग्रेस पुढारी एकीकरणासाठी प्रयत्न करत नसल्याचे म्हटले. इ. स. १९४६चे साहित्य संमेलन माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली झाले. या संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन झाले व संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव साहित्यकांनी पाठवले ज्याला राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. इ. स. १९४६ रोजीच भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेत स.का.पाटील यांनी मुंबईला महाराष्ट्राची राजधानी करण्यास विरोध केला. महाराष्ट्रातील डाव्या पक्षांनी सुरुवातीपासूनच मुंबईसह महाराष्ट्राला पाठिंबा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठिंबा होता. या चळवळीला पाठिंबा दर्शविण्याकरिता अनेक ठिकाणी सभा त्यांनी घेतल्या होत्या. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक घटक पक्ष होता.. २८ नोव्हेंबर १९४९ रोजी मुंबई महापालिकेत संयुक्त महाराष्ट्राचा पहिला ठराव आचार्य अत्रे व डॉ. आर.डी. भंडारे यांनी 'मुंबईसह महाराष्ट्र'चा ठराव शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने मांडला. स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्यांची मागणी होऊ लागली. आंध्र प्रदेश राज्याची मागणी पोट्टी श्रीरामलू यांच्या बलिदानानंतर पूर्ण झाली. भाषावार प्रांतरचेनेसाठी नेमलेल्या कमिशनाने महाराष्ट्र राज्याची मागणी डावलली.

दार कमिशन व जे.व्ही.पी कमिटी

डिसेंबर इ. स. १९४८ रोजी प्रसिद्ध झालेल्या दार कमिशनच्या अहवालात भाषावर प्रांतरचनेला विरोध दर्शविण्यात आला होता व महाराष्ट्रीय लोकांवर अपमानास्पद टिप्पणी होती. जे.व्ही.पी कमिटीने महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या मागणीला पाठिंबा दिला नाही व मुंबई महाराष्ट्रात देण्यास विरोध केला. मुंबई अनेक भाषांच्या व वर्णाच्या लोकांचे, उद्योगधंद्याचे शहर आहे असे अहवालात म्हटले होते. वल्लभभाई पटेलांनी मुंबईचा विकास गुजराती भाषकांनी केल्याचे नमूद केले.

फाजलअली आयोगाचा निवाडा

डिसेंबर इ. स. १९५३ रोजी फाजलअली यांच्या अध्यक्षेतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या वतीने एस.एम.जोशी, धनंजय गाडगीळसह इतरांनी आयोगासमोर आपली बाजू मांडली. इ. स. १९५५ रोजी आयोगाचा निवाडा जाहीर झाला. पुनर्रचनेबाबत पायाभूत तत्त्व सगळ्यांना सारखी लागू केलेली नव्हती आणि त्यात मोठी विसंगती होती. हैद्राबादसाठी एक भाषिकाच तत्त्व तर मुंबईसाठी द्वैभाषिकाचं. मुंबई प्रांतात गुजराती भाषिक सौराष्ट्र समाविष्ट करून मराठी भाषिक विदर्भ ,बेळगाव-कारवार बाहेर ठेवले गेले. मुंबईच्या विकासासाठी तिला गुजरातपासून वेगळे ठेवणे योग्य नाही व बेळगाव भाग कर्नाटकाशी 'आर्थिकदृष्ट्या' जोडला असल्याचे तसेच विदर्भ महाराष्ट्रात घातल्यास नागपूर शहराचे महत्त्व कमी होईल असे अहवालात नमूद करण्यात आले. आयोगाला या द्वैभाषिकात मराठी भाषिकांची संख्या गुजराती भाषिकांपेक्षा जास्त होऊ द्यायची नव्हती असेच या विसंगतीचे कारण म्हणावे लागेल.

**त्रिराज्य योजना–** या आयोगाच्या विरोधात महाराष्ट्रभर असंतोषाचा डोंब उसळला. नेहरूनी त्यामुळे सौराष्ट्रासह गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र व स्वतंत्र मुंबई अशा त्रिराज्य योजना जाहीर केली. त्रिराज्य योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत पसरली व संयुक्त महाराष्ट्र चळवळीने पेट घेतला. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे या आंदोलनाचे घोषवाक्य बनलं.महाराष्ट्रीय काँग्रेस नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वासमोर गुडघे टेकले. यामुळे काँग्रेसनेते जनतेच्या नजरेतून उतरले. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे ज्येष्ठ नेत्याने तर नेहरु व संयुक्त महाराष्ट्रात, मला नेहरु महत्त्वाचे वाटतात असे म्हटले. महाराष्ट्रातील कम्युनिस्ट, सोशालीस्ट व प्रजासमाजवादी पक्षातील डावे पुढारी व काँग्रेसेतरांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा हातात घेतला. सेनापती बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस.एम. जोशी, प्रल्हाद केशव अत्रे, श्रीपाद डांगे, शाहीर अमर शेख, भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे हे चळवळीतील महत्त्वाचे नेते ठरले. एस.एम. जोशी, श्रीपाद डांगे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. अत्र्यांनी आपल्या 'मराठा' या दैनिकात संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार केला तर विरोधकांवर बोचरी व कठोर टीका केली. त्यांच्या भाषणातून संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाऱ्याचा खरपूस समाचार घेतला. शाहीर अमर शेख,शाहिर अण्णाभाऊ साठे,शाहिर गव्हाणकर ह्यांनी आपल्या कलाविष्काराने मराठी अस्मिता जागृत ठेवली. २० नोव्हेंबर इ. स. १९५५ मोरारजी देसाई व स.का.पाटील या काँग्रेस नेत्यांनी चौपाटीवर सभा घेऊन प्रक्षोभक विधाने केली. पाटलांनी 'पाच हजार वर्षांनी सुद्धा मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही व मोरारजींनी 'काँग्रेस जिवंत असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, गुंडगिरीला योग्य जबाब मिळेल' अशी मुक्ताफळं उधळली. लोकांनी संतापून सभा उधळली. २१ नोव्हेंबर इ. स. १९५५ रोजी झालेल्या आंदोलनावेळेस पोलिसांनी केलेल्या गोळीबारामुळे १५ जणांना प्राण गमवावा लागला. जाने-फेब्रु इ. स. १९५६ रोजी केंद्रशासित मुंबईची घोषणा केल्यानंतर लोक रस्त्यावर उतरली. हरताळ, सत्याग्रह व मोर्चे सुरू झाली. मोरारजीच्या सरकारने सत्तेचा दुरुपयोग करून निष्ठूरपणे ८० लोकांना गोळीबारात मारले. संयुक्त महाराष्ट्रातील आंदोलनात एकूण १०५ जणांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या स्मरणार्थ मुंबईच्या फ्लोरा फाउंटन भागात हुतात्मा स्मारक उभारले गेले. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे प्रचंड सत्याग्रह घडवून आणला. चळवळीच्या काळात जनतेच्या असंतोषामुळे, नेहरुंना महाराष्ट्रात सुरक्षारक्षकांसोबत फिरावे लागे व त्यांचे स्वागत काळ्या झेंड्यांनी व निषेधानेच होई. भारताचे अर्थमंत्री सी.डी देशमुखांनी महाराष्ट्रावरील होणाऱ्या अन्यायाच्या निषेधार्थ आपला राजीनामा दिला. या राजीनाम्यामुळे चळवळीला अधिक बळ मिळाले.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना– नोव्हेंबर इ. स. १९५६ला केंद्राने सौराष्ट्र, गुजरात,मराठवाडा, विदर्भ व मुंबई इलाख्यातील सर्व मराठी प्रदेश मिळून (परंतु बेळगाव-कारवार वगळून) विशाल द्विभाषिक स्थापले. परंतु या द्विभाषिकाचे महाराष्ट्र व गुजरात येथेही कडाडून विरोध झाला. या समितीने १९५७ सालची लोक सभा आणि विधानसभा निवडणूक लढवली. या सार्वत्रिक निवडणुकीत समितीला भरघोस यश मिळाले. त्यात बलाढ्य काँग्रेसच्या विरोधात निवडणुकीत या समितीला ३९८ जागांपैकी तब्बल १५५ जागांवर विजय मिळाला. स्वाभाविकच ही समिती प्रमुख विरोधी पक्ष बनली. आणि डॉ. आर.डी. भंडारे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या पहिल्या विरोधी पक्षनेते पदाचा मान भुषविला. काँग्रेसचे नेतृत्व या सर्व प्रकारामुळे व १९६२ला होणाऱ्या निवडणुकीला सामोरे जायचे असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल झाले.

## जपान अंतराळात सूर्यापासून वीजनिर्मिती करणार, पृथ्वीवर कशी आणणार?

आता अंतराळात वीजनिर्मिती केली जाणार आहे. सूर्याच्या शक्तीचा वापर करून अंतराळात वीज निर्मिती करण्याचा जपानचा प्रयत्न आहे. इतकंच नाही तर जपान ही वीज पृथ्वीवर देखील आणू शकतो आणि त्याचा वापर करू शकतो. पण प्रश्न असा आहे की हे कसे करता येईल. कारण, पृथ्वीवर जपान वीज कशी आणणार, याविषयीची माहिती देखील पुढे विस्ताराने जाणून घेऊया.

आज आम्ही तुम्हाला एक अशी माहित सांगणार आहोत, ज्यावर तुमचा कदाचित विश्वास बसणार नाही. आता अंतराळात वीजनिर्मिती केली जाणार आहे. तुम्ही म्हणाल हे कसं शक्य आहे. पण हे शक्य असून ही वीजनिर्मिती जपान करणार आहे.

सूर्याच्या शक्तीचा वापर करून अंतराळात वीज निर्मिती करण्याचा जपानचा प्रयत्न आहे. आता ही वीजनिर्मिती म ायक्रोवेव्हच्या स्वरूपात असेल, असे संशोधकांनी सांगितले. ते वायरलेस पद्धतीने एनर्जी बीमप्रमाणे पाठवले जाईल आणि अँटेनाद्वारे पकडले जाईल.

हे अगदी अवास्तव वाटत असले तरी मिशन पूर्ण करण्यासाठी सर्व काही आधीच तयार आहे. जपान लवकरच २२ चौरस फूट (२ चौरस मीटर) सौर पॅनेलसह ४०० पौंड वजनाचा उपग्रह पृथ्वीच्या खालच्या कक्षेत प्रक्षेपित करणार आहे. पॅनेल सूर्यप्रकाश गोळा करेल आणि ऑनबोर्ड बॅटरी चार्ज करण्यासाठी त्याचा वापर करेल. जपान स्पेस सिस्टीम्सचे (गडड) सल्लागार कोइची इजिची यांनी डरिलश. ले सांगितले की, हा एक छोटा सॅटेलाईट असेल, ज्याचे वजन सुमारे १८० किलो ग्रॅम (४०० पौंड) असेल आणि सुमारे ४०० किलोमीटर उंचीवरून सुमारे १ किलोवॅट वीज प्रसारित करेल. या प्रकल्पाचे नाव ओहिसामा आहे, ज्याचा अर्थ जपानी भाषेत सूर्य असा होतो. उपग्रह प्रक्षेपणाची नेमकी तारीख अद्याप सांगितली गेली नसली तरी एप्रिलनंतर केव्हाही हे प्रक्षेपण होऊ शकते, असे वृत्त आहे.

'या' प्रकल्पाचा सर्वात चांगला भाग कोणता?

पृथ्वीवरील विजेचे पारेषण. नियमित सौर पॅनेलद्वारे ऊर्जे चे विजेत रूपांतर होऊन तारांच्या माध्यमातून प्रसारित केले जाते. मात्र, अंतराळातून वीज पाठवताना हे शक्य होत नाही. हा सॅटेलाईट विजेचे मायक्रोवेव्हमध्ये रूपांतर करेल आणि ऊर्जा बीमच्या रूपात वायरलेस पद्धतीने प्रसारित करेल. या कामासाठी खास डिझाइन केलेला अँटेना त्याला पकडणार आहे. हा सॅटेलाईट ताशी २८ हजार किलोमीटर वेगाने धावणार आहे. म्हणजेच वेव्ह पकडण्यासाठी अनेक किलोम ीटर धावणाऱ्या अँटेनाची गरज भासणार आहे. मात्र, आता या पद्धतीची व्यवहार्यता जाणून घेण्याचा हेतू आहे, त्यामुळे एक छोटा अँटेना पुरेसा ठरेल. सुवा येथील ६०० चौरस मीटर क्षेत्रात पसरलेल्या तेरा रिसिव्हरची रचना वीज मिळण्यासाठी करण्यात आली आहे. उद्योगाला पाठवलेली ऊर्जा केवळ एक तास डिशवॉशर चालविण्यासाठी पुरेशी असेल, परंतु जर ते कार्य करत असेल तर या तंत्रज्ञानाचा उपयोग अंतराळात सूर्याचा वापर करून अधिक स्वच्छ ऊर्जा तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो.


## महाराष्ट्र दिन चिरावू हो !

**महाराष्ट्र** दिन हा दिवस महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी झालेल्या मुंबई राज्याच्या विभाजनापासून महाराष्ट्र दिन हा सामान्यतः परेड आणि राजकीय भाषणे तसेच समारंभांशी संबंधित आहे. तसेच इतर विविध सार्वजनिक आणि खाजगी कार्यक्रमांबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा या दिवशी साजरे करतात. राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ सार भाषांच्या आधारे भारतातील राज्यांसाठी सीमा परिभाषित केल्या गेल्या. या कायद्याचा परिणाम म्हणून जे मुंबई राज्य निर्माण झाले, ते मात्र वेगवेगळ्या मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषा बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रांचे मिळून बनले होते. संयुक्त महाराष्ट्र समिती मुंबई राज्याचे दोन राज्यात विभाजन करण्याच्या चळवळीत आघाडीवर होती; एक भाग जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरा भाग जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोकणी बोलतात. २५ एप्रिल १९६० रोजी भारतीय संसदेने लागू केलेल्या बॉम्बे पुनर्रचना कायदा, १९६० नुसार या चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांची निर्मिती झाली. हा कायदा १ मे १९६० रोजी अंमलात आला. २१ नोव्हेंबर १९५६ दिवशी फ्लोरा फाउंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले त्यामुळे मराठी माणसे चिडली होती. सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनासमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून व दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरून उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र अढळ सत्याग्रहीं मुळे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेऊन १ मे, १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर १९६५ मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. जय जय महाराष्ट्र माझा:.गर्जा महाराष्ट्र माझा:.सर्व मराठी बांधवांना आणि महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला महाराष्ट्र आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा! आम्हाला अभिम ान आहे महाराष्ट्रीय असण्याचा, आम्हाला गर्व आहे मराठी भाषेचा आम्ही जपतो आमची संस्कृती, आमची निष्ठा आहे मातीशी.

**– प्रविण बागडे**

# कामगार दिनी कामगारांसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान

**सर्वप्रथम आपल्याला प्रश्न पडतो की कामगारांचे नेमके नेते कोण?. आपल्यालाच नाही तर अनेकांना प्रश्न पडतो. आणि प्रश्न पडलाच पाहिजे. प्रश्न त्यालाच पडतात ज्याला चिकित्सा करण्याची शैली असते. कामगारांचे नेते हे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे जग जाहीर आहे. आज प्रत्येक कष्टकरी गोरगरीब आणि शेतकरी वर्ग असो यांच्यासाठी अविरतपणे काम करणारे आधारस्तंभ म्हणून उभे राहणारे आणि आपण कोणाला ओळखत असाल तर ते फक्त आणि फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना...**




या कामगार दिनी मला खूप काही सांगावं असं वाटत नाही पण नेमके काही इतिहासाचे पान जरा बघूयात....देशाच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊन त्या आपल्या ध्येयास अनुकूल बनवल्या शिवाय आपले दुःख दूर करता येणार नाही याची जाणीव हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना होती. आणि यासाठी त्यांनी १९३५ च्या कायद्यानुसार होणाऱ्या निवडणुकांसाठी १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. या पक्षाचे कार्य कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी असल्यामुळे दलित शब्द ऐवजी त्यांनी मजूर शब्द स्वीकारला. १९३७ च्या निवडणुकीत या पक्षाने १३ जागा जिंकल्या. बाबासाहेब निवडून आले. १९३७ ते १९४२ च्या काळात मजूर पक्षाने शेतकरी व कामगारांच्या प्रश्नाविषयी विधिमंडळात व बाहेर आवाज उठविला.मजुरांच्या कामाचे तास आठ केले. मजुरांना निवारा व त्यांच्या शिक्षणाची सोय केली.या संघटनेच्या माध्यम ातून कष्टकरी शेतकरी गोरगरीब या लोकांचा बाबासाहेबांनी विचार केला. आजच्या काळात प्रत्येक कामगाराने बाबासाहेबांना अभिवादन केलं पाहिजे ज्यांच्यामुळे आज ते कष्टाने भाकर खात आहेत.संविधानाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी महत्त्वाचे जे काम केले व या अफाट कार्यासंबंधी भारतीय कामगार व कामगार संघटनांना अजुनही पुरेशी जाणीव झालेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. कामगारांसाठी बाबासाहेबांनी दिलेले योगदान आहेत ते थोडक्यात बघूयात..

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतर्कयांसाठी किमान वेतन दर असावेत अशी मागणी विधिमंडळात केली. १९३७ साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्यासंबंधी खोती पध्दत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले. १९३८ साली कोकणातील 'औद्योगिक कलह विधेयकानुसार' कामगारांचा संप करण्याचा अधिकार हिरावुन घेतला गेला. पण बाबासाहेबांनी या बिलावर भाषण करतांना संप हा दिवाणी अपराध आहे. फौजदारी गुन्हा नव्हे असे मत दिले व पुढे कामगारांना संप करण्याचा कायदेशिर अधिकार मिळवून दिला. वरील बिलावर भाष्य करतांना मालकांनी आपले अंदाजपत्रक कामगारांसाठी जाहीर करण्याची मागणी केली.

१९३८ मध्ये सावकारी नियंत्रण विधेयक तयार केले. बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.२ जुलै १९४२ ला ते व्हॉईसरॉय मंत्रीमंडळात काम गार मंत्री झाले. २ सप्टेंबर १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली. ही योजना लेबर चार्टर म्हणून प्रसिध्द आहे. युध्द साहित्य निर्माण करर्णाया कारखान्यात एक 'संयुक्त कामगार नियामक समिती' स्थापन केली. सेवा योजन कार्यालय (एस्ज्त्दब्सहू'ऐम्प्हु) ची स्थापना केली.



कामगारांना अगोदर भरपगारी रजा मिळत नव्हती. १४ एप्रील १९४४ ला बाबासाहेबांनी भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले. कामगारांना कमीत कमी वेतन ठरविण्याची तरतूद असलेले बिल मांडले. ह्यातूनच यकिमान वेतन कायदा १९४८' ची निर्मिती झाली. औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारी यंत्रणा (लवाद यंत्रणा) उभारण्याची तरतूद केली. सप्टेंबर १९४३ रोजी भरलेल्या त्रिपक्षीय कामगार परिषदेचे बाबासाहेब अध्यक्ष होते. त्यात त्यानी कामगारांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक गरजा व आरोग्याचे उपाय तसेच कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी उपाय यावरील ठराव संमत केले. ३१ जानेवारी १९४४ रोजी खाण कामगारांसाठी 'कोळसा खाण काम गार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले.

ऑगष्ट १९४५ मध्ये औद्योगिक वसाहतीचे नियम व मालकाच्या जबाबर्दाया यावर विचारविनिमय करर्णाया स्थायी समितीचे अध्यक्षपद भूषविले. त्यात त्यांनी उद्योगासाठी मौलिक सूचना केल्या.८ एप्रील १९४६ ला 'मिका माईन्स लेबर वेल्फेअर फंडाची' स्थापना करण्यासंबंधीचे बिल संमत केले. 'इंडियन्स माईन्स (अमेंडमेंड) ऑर्डिनन्स १९४५' नुसार स्त्री कामगारांच्या मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापनावर बंधन घातले.भारतिय खाण कायदा १९४६' तयार करुन स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आंतमध्ये काम करण्यास व रात्रपाळीस बंदी केली. दि.माईन्स मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट' नुसार खाणीतील स्त्रीयांना बाळंतपणाची (प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतर) रजा देण्याची शिफारस केली. 'दि. फॅक्टरी अमेंडमेंट बिल' संमत करुन कामगारांना १० दिवसाची पगारी रजा आणि बाल काम गारांना १४ दिवसाची पगारी रजा देण्यासंबंधी कायद्यात दुरुस्ती केली.१९४६ च्या बजेट सेशन मध्ये आठवड्याचे कामाचे तास ५४ वरुन ४८ व दिवसाला १० तासांएवजी ८ तास करण्याचे बिल मांडले.अपघातग्रस्त कामगारांना मोबदला मिळावा म्हणून 'कामगार भरपाई कायद्याची' निर्मिती केली.

२१ फेब्रुवारी १९४६ साली मध्यवर्ती कायदे मंडळात 'दि इंडियन्स ट्रेड युनियन्स (अमेंडमेंड) ?क्ट आणून ट्रेड युनियनला मान्यता देणे व्यवस्थापनाला सक्तिचे करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.१९ एप्रील १९४६ ला मध्यवर्ती कायदे मंडळात कमीत कमी मजुरी आणि कामगारांची संख्या किती असावी या संबंधी बिल मांडले व त्याचेच १९ फेब्रुवारी १९४८ ला कायद्यात रुपांतर झाले.बाबासाहेबांनी भारतीय घटनेची निर्मिती केली. त्यातील 'मार्गदर्शक तत्व' आर्टिकल ३९ (ड) नुसार पगारदार पुरुषा इतकाच पगार त्याच पदावर काम करर्णाया स्त्रियांनाही मिळावा अशी घटनात्मक तरतूद केली.

घटनेच्या कलम ४३ नुसार गर्भवती व बाळंत स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी योग्य व सुरक्षित व्यवस्था ठेवण्याची तरतूद केली.कलम ४३ (अ) नुसार शासनाने कामगारांना व्यवस्थापनात सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी तरतूद केली. कलम ४३ नुसार शासनाने कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक संधी देण्यासाठी प्रयत्न करण्याची तरतूद केली.'स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हात घालतांना बाबासाहेब 'वेठबिगार हा गुन्हा आहे' असे मत मांडले आहे.कामगारांचे आथिक जीवनमान उंचावण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात आर्थिक धोरण स्पष्ट केले. त्यातील आर्टीकल २ सेक्षन २ (४) मध्ये आर्थिक शोषणाच्या विरोधात स्पष्टीकरण केले. त्यात काम गारांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संपत्तीची जास्तीत जास्त समान वाटणी करण्याबद्द?ल राज्याने प्रयत?न करावेत अशी सुचना केली.

शेतीच्या प्रगतीसाठी व शेतर्कयांच्या उत्कर्षासाठी लँड मॉर्गेज बँक,शेतर्कयांची पतपेढी,खरेदी विक्री संघ स्थापण करण्याविषयी धोरण व्यक्त केले.खरं तर अनेक लेखा मध्ये आपण विचार व्यक्त करतो पण नेमकं डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांसाठी काय केले हे अस्पष्ट असते म्हूणन माझ्या या लेखात माझे विचार कमी आणि मूळ बाबासाहेबांनी काय दिलंय हे महत्वाचे आहे. हे लेख सर्व भारतीय नागरिकांपर्यत गेले पाहिजे आणि कामगारांना त्यांचे संविधानिक अधिकार माहिती पाहिजे तर आणि तरच अपने १ मे काम गार दिन र्खया अर्थाने साजरा करत आहोत... सर्वांनाच १ मे कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

जय महाराष्ट्र, जय शिवराय, जय संविधान.

**– अखिल मेश्राम**
९५९५९४३९९६ (पुणे)
संचालक, मोटिवेटर / लेखक / संपादक

## मनपात महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**महात्मा बसवेश्वर महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित मनपा मुख्यालय येथे अभिवादन करण्यात आले. मनपा मुख्यालय येथे मा.अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, उप आयुक्त लखीचंद चव्हाण, लेखाधिकारी संजय कोलते, सांस्कृतिक अधिकारी शंभू विश्वासू, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद,विभागाचे रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, नवीद खान,आदी कर्मचारी उपस्थित होते.**




**महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित अभिवादन करताना आयुक्त तथा प्रशासक.**

## महाराष्ट्र राज्याची उत्तुंग झेप

**देशातील** विविध राज्यापैकी महाराष्ट्र हे विकसनशील राज्य आहे.१मे,१९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झालेली आहे,४जवळपास ६५ वर्षाच्या या कालखंडात राज्याने सर्वच क्षेत्रात उत्तुंग झेप घेऊन देशाच्या ईतर राज्यांपेक्षा मोठ्या प्रमाणात प्रगती साधलेली आहे. पुरोगामी राज्य म्हणून महाराष्ट्र कडे पाहिले जाते.केंद्र सरकारने एखादी जन कल्याणकारी योजना राबवयाची ठरविली तर ती महाराष्ट्र राज्यात प्रथम आजम ावतात व मग देशात लागू करतात.

महाराष्ट्र राज्याच्या या आधुनिक जडण-घडणीत येथील सर्वच समाजातील नागरिकांचा मोठा वाटा आहे.महाराष्ट्रीयन माणूस कष्ठाळू,म ेहनती,धीर व संयम पाळणारा आहे.महाराष्ट्र राज्याला थोर समाज सुधारकांचा ,साधू संतांचा मोठा वारसा ही लाभलेला आहे. त्यांच्या वारस्यातूनच ईथला समाज आज प्रगतीची उच्च शिखरे गाठीत आहे.सहकारी क्षेत्राची महाराष्ट्र राज्याला मोठी देणं आहे. या सहकारी तत्वाला अनुसरून मोठं मोठे कारखाने ,उद्योग,व्यवसाय महाराष्ट्र राज्यात आल्याने राज्याचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. महाराष्ट्रच्या सहकारी तत्वावरील झालेल्या भरभराटीमुळे संपूर्ण देशाला सहकाराचे पाठ देणारे राज्य म्हणून महाराष्ट्र कडे पाहिले जाते. राज्यात सिंचन सुविधा ही वेगवेगळ्या स्रोत द्वारे सुरू करून राज्याचे शेती उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

राज्यातील बरीच शेती ओलिताखाली आल्याने शेती उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.राज्यातील विविध धरणांमुळे महाराष्ट्राची शेती सुजलाम-सुफलाम झालेली आहे. राज्यात दळण-वळण सोयी वाढलेल्या आहेत, राज्यातील मेट्रो शहरात मोठं मोठे कारखाने उभे राहिलेले आहेत, त्यामुळे रोजगाराच्या संधी तरुण वर्गाला मिळाल्या आहेत.राज्यात सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध असून राज्यातील विद्यार्थी उच्च शिक्षण प्राप्त करून राज्याच्या,देशाच्या विविध उद्योगात सहकार्य देत आहेत.

राज्यातील नागरिकांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून मोठ्या प्रमाणात रुग्णालये,सोयी,सवलती उपलब्ध आहेत,राज्यातील सर्व खेडी ,शहरांशी ,शहरे जिल्हा व व जिल्हे राजधानी शी सुसज्ज रस्त्यांनी जोडण्यात आलेली आहेत. ऐतिहासिक वारसा राज्याने टिकवून ठवलेला आहे.

या सर्व बाबी पाहता महाराष्ट्र राज्य देशात अव्वल स्थानी राज्य आहे,असे म्हणणे वावगे ठरणार नाही. महाराष्ट्र राज्य देशातील विकसित राज्य आहे, देशाची आर्थिक राजधानी असणारी मुंबई राज्याची राजधानी देश विदेशातील सर्व नागरिकांचे आकर्षण आहे, या मुंबई शहरामुळे जगात महाराष्ट्र राज्याचा लौकिक आहे.अशा समृद्ध, वैभवशाली, व प्रगतिशील महाराष्ट्र राज्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# घर घर संविधान; राज्यघटनेचा अभिमान प्रत्येकाने बाळगावा- पालकमंत्री संजय शिरसाट







**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहून आपल्या सगळ्यांना समता न्याय आणि अधिकार दिला आहे. या राज्यघटनेबद्दल विदेशात कमालीचा आदर आहे. आपण प्रत्येकाने या राज्यघटनेचा अभिमान बाळगायला हवा, असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात घर घर संविधान अभियानांतर्गत देशभक्तीपर गितांचा कार्यक्रम आयोजीत केला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजीत या कार्यक्रमास विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, नीलम बाफना, संगिता राठोड, एकनाथ बंगाळे, रामदास दौड तसेच सर्व विभागप्रमुख व जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, घरघर संविधान या अभियानाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन संविधानाविषयी जागरुकता निर्माण करुन संविधानात सामान्यांच्या अधिकार कर्तव्याबाबत जाणीव जागृती करावी.जाणकारांनी संविधानाचा बारकाईने अभ्यास करावा. ही सर्वसमावेशक घटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आपल्याला देण आहे. या घटनेमुळेच मीही आज तुमच्या समोर उभा आहे.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले तसेच विभागीय आयुक्त गावडे यांनीही आपल्या मनोगतातून संविधानाची महती सांगितली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.

# आंतरजातीय विवाह केलेल्या १४० जोडप्यांना अनुदान वितरीत

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना समाजकल्याण विभागामार्फत चालविली जाते. जिल्ह्यात असे १४० लाभार्थी जोडपे होते.

त्यांना प्रति जोडपे ५० हजार रुपये या प्रमाणे ७० लाख रुपयांचा लाभ वितरीत करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी दिली आहे.

समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेत जिल्ह्यात १४० लाभार्थी पात्र होते. त्यांना लाभ देण्यासाठी ७० लक्ष रुपयांची तरतूद प्राप्त झाली होती.

७२ लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली होती. मात्र ५६ लाभार्थ्यांचे ॲप्रुव्हल दि.३१ मार्च रोजी कालबाह्य झाले होते व १२ लाभार्थ्यांना बँकेकडून ॲप्रुव्हल मिळाले नसल्याने ६८ लाभार्थ्यांच्या लाभाची तरतूद शासनास परत गेली होती. तथापि, प्रादेशीक उपायुक्त दीपक खरात, आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांना याबाबत समाज कल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी माहिती दिली.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आदेश निर्गमित करुन उर्वरीत ६८ लाभार्थ्यांचे अनुदान ३४ लाख रुपये तात्काळ पुन्हा अनुदान वितरीत करण्यात आले. आता या सर्व १४० लाभार्थ्यांना लाभाचे वितरण झाले आहे.

# महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर आणि उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय मदत कक्षाचे आज(दि.१ मे) पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालयांमार्फत नागरिकांना द्यावयाच्या मदतीसाठी कार्य करणाऱ्या जिल्हास्तरीय मदत कक्षाचे गुरुवार दि.१ मे रोजी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या कक्षाचे कामकाज होईल.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाचे गुरुवार दि.१ मे रोजी सकाळी १० वा पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उद्घाटन होईल. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे हा उद्घाटन सोहळा पार पडणार आहे.

या कक्षाद्वारे रुग्णांना वैद्यकीय उपचारकरिता अर्थसह्याय सहज उपलब्ध व्हावे, नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या प्रकरणाची माहिती आपल्याच जिल्ह्यात व्हावी तसेच नागरिकांच्या पैशाचा व वेळाचा अपव्यव टाळण्याकरिता हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

तसेच नैसर्गिक आपत्ती, दहशवादी हल्ला, दंगल इ मध्ये मृत किंवा दुखापत झालेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या वारसांना आर्थिक किंवा अन्य मदत कक्षाच्या माध्यमातून केली जाणार आहे. या कक्षाद्वारे रुग्णांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या इतर आरोग्यविषयक योजनांची माहिती दिली जाणार आहे. तसेच वेळोवेळी आरोग्य शिबीरे घेऊन केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत.

शासनाने या छत्रपती संभाजीनगर येथील कक्षात वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी गोरे, लिपिक सचिन दोडे, समाजसेवा अधीक्षक श्यामसुंदर वाकळे या तीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

# अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शिवराई ता.गंगापूर येथे ऊस तोडणी कामगाराची भाची काजल शरद राठोड ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. पोलिसांत श्रीमती वर्षा अमोल पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास जेवण करुन झोपले असता. रात्री १ वाजेच्या सुमारास व सकाळी ४ वाजेच्या ऊसतोडच्या कामासाठी जाण्यासाठी उठलो असता भाची आढळून आली नाही. भाचीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही, म्हणून तक्रार नोंदविण्यात आली. काजल हिचे वर्णन खालीलप्रमाणे- रंग सावळा केस काळे व लांब, बांधा सडपातळ, उंची ४ फूट, अंगात, लाल रंगाचा पंजाबी ड्रेस व लाल रंगाची पँट, पायात चप्पल नाही, भाषा मराठी, हिंदी, लमाणी भाषा बोलते. अधिक तपास पोलीस हेड कॉनस्टेबल बी.ई.शिंदे करीत आहेत.या बालिकेविषयी अधिक माहिती मिळाल्यास वाळूज पोलिसांत माहिती द्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री घृष्णेश्वर मंदिरा बाहेर निघण्याचे द्वार आता प्रशस्त स्वरुपात, दर्शनाची कोंडी सुटणार



**भिंत भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने परवानगी मिळवणं हे मोठं आव्हान होतं.मात्र, देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने दिल्लीमध्ये पाठपुरावा करत संबंधित मंत्रालयाची मंजुरी मिळवली.**

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील प्राचीन आणि पवित्र १२ वे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री घृष्णेश्वर मंदिराच्या दर्शन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आली आहे. मंदिराबाहेर दर्शना नंतर बाहेर पडण्यासाठी नव्याने एक प्रशस्त द्वार उभारण्यात आले असून,त्यामुळे भाविकांची होणारी कोंडी सुटणार आहे.

या संदर्भात मिळालेल्या माहिती नुसार, मंदिराच्या मागील बाजूस पूर्वी फक्त भिंत होती आणि तेथून भाविकांना बाहेर पडता येत नव्हते. त्यामुळे आत येणं आणि बाहेर जाणं हे एकाच दरवाजातून करावं लागत होतं. शिवाय,या भिंतीच्या जागी द्वार तयार करावा अशी मागणी गेल्या अनेक वर्षां पासून देवस्थान ट्रस्टकडून करण्यात येत होती. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या काळात मंदिरात प्रचंड गर्दी होत असते.त्या वेळी एकाच मार्गाने दर्शनासाठी आत जाणे आणि पुन्हा त्याच मार्गाने बाहेर पडणे यामुळे भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत असे.ही भिंत भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येत असल्याने परवानगी मिळवणं हे मोठं आव्हान होतं.मात्र, देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने दिल्लीमध्ये पाठपुरावा करत संबंधित मंत्रालयाची मंजुरी मिळवली. त्यानंतर अखेर नवीन द्वार उभारण्यात आलं असून,भाविकांमध्ये याबाबत समाधान व्यक्त होत आहे.या सुधारणेमुळे आता दर्शनानंतर भाविकांना वेगळ्या मार्गाने बाहेर पडता येणार असून, गर्दीतून होणारी कोंडी व त्रास लक्षणीयरीत्या कमी होणार आहे.

# खुलताबाद शहराला पाणी पुरवठा करणारे जलवाहिनीच्या कामाला वेग; निवेदनानंतर अधिकाऱ्यांकडून पाहणी

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील येसगाव येथील गिरिजा मध्यम प्रकल्पातून शहरासाठी येसगाव हून खुलताबाद शहरात येणाऱ्या नवीन पाणीपुरवठा जलवाहिनीचे कामाला आले वेग या पाणीपुरवठा योजने अंतर्गत सुरू असलेल्या जलवाहिनी व ड्रेनेज लाईनच्या कामाला आता वेग मिळाल्याचे दिसून येत आहे.

नागरिकांच्या तक्रारी व कामाच्या गुणवत्ता बाबत संशयापता व्यक्त करत माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवक मुनिबोद्दीन, शरफोद्दीन रमजानी, नईम बक्ष,सलीम जागीरदार यांनी नुकतीच नगर परिषदेचे मुख्याधिकारी शेख समीर व उपअभियंता दिलीप कोलते यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले होते.

या निवेदना नंतर प्रशासनाने तात्काळ दखल घेत बुधवारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा उप अभियंता दिलीप कोलते. अभियंता सागर सावजी यांनी शहरातील मुख्य रस्त्यावरील जलवाहिनी व ड्रेनेज लाईनच्या कामाची पाहणी केली.त्यांनी स्थानिकांना ड्रेनेज लाईन लवकरच टाकण्याचे आश्वासन दिले असून, पाईपलाइनची गुणवत्ता राखून काम वेळेत पूर्ण करण्याची हमी दिली आहे. आवश्यकता भासल्यास नवीन पाइप जोडण्याचेही आश्वासन यावेळी देण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष ॲड. कैसरोद्दीन, माजी नगरसेवक मुनिबोद्दीन, सलाहोद्दीन मौलाना, मोईनोद्दीन,हनीफ कुरेशी,शफीयोद्दीन मुजावर, अब्दुल चिश्ती आदी मान्यवर उपस्थित होते. कामावर अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष दिल्याने आणि सकारात्मक प्रतिसाद दिल्याने ॲड. कैसरोद्दीन यांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# गो उत्पादन वस्तूंच्या मंत्रालय येथील दोन दिवसीय प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने गो उत्पादन दिनानिमित्त मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात दोन दिवसीय गोमय मूल्यवर्धित उत्पादन विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनात पंचगव्यांपासून बनवलेल्या वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी ठेवण्यात आल्या. या प्रदर्शनास मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अभ्यांगतांनी भरघोस प्रतिसाद दिला. ३० एप्रिल हा दिवस यावर्षीपासून गो उत्पादन दिन म्हणून साजर करण्यात येत आहे. त्यानिमित्त मंत्रालयात या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात राज्यातील विविध जिल्ह्यातील गो शाळांच्या प्रतिनिधींनी सुबक आणि उत्कृष्ट वस्तू विक्रीसाठी ठेवल्या होत्या. यामध्ये पंचगव्यांपासून बनवण्यात आलेल्या वस्तू भीमसेन कापूर, बिना बांबू अगरबत्ती, धूप, सांबरणी धूप आदी पुजेच्या साहित्यांचा समावेश होता. या व्यतिरिक्त लक्ष्मीची पाऊले, श्रीयंत्र, गणेश मूर्ती, कृष्ण मूर्ती, तोरण, की चैन, लटकन, दिवे, राखी यासारख्या शोभेच्या वस्तू प्रदर्शनाचे आकर्षण होत्या. याबरोबर या प्रदर्शनात उत्तम शारीरिक आरोग्यासाठी आवश्यक पंच्यगव्यापासून तयार केलेले तेल, फंगल इन्फेक्शन स्प्रे, पचनशक्ती / रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी अर्क, जखमसाठी मलम, डोळे आणि कानात टाकण्यासाठी श्रवण थेंब या वस्तू देखील विक्रीसाठी उपलब्ध होत्या. याशिवाय सौंदर्यवर्धनासाठी सुगंधी उटणे, गोरस सोप, उटणे, दंतमंजन या वस्तू खरेदी करण्याकडे कल दिसून येत होता. याशिवाय गोवऱ्या, गांडूळ खत, शुद्ध तूप या वस्तू देखील होत्या. पंचगव्यापासून तयार करण्यात आलेल्या औषधांचे फायदे यासंदर्भात पुस्तकांचे दालन देखील प्रदर्शनात होते.

या प्रदर्शनात धुळे जिल्ह्यातून श्रीकृष्ण गोशाळा, वाशिमची छत्रपती गोशाळा, नागपूरची गो विज्ञान अनुसंधान केंद्र, अहिल्यानगरची यशोदानंद गोशाळा, सोलापूरच्या पंढरपूर येथील गोपाळनाथ गो शाळा आणि राधेकृष्ण गोशाळा, भिवंडीतील ग्रामीण प्रगती फाउंडेशन गोशाळा, कोल्हापूर शिरोळ येथून वेद खिल्लार गोशाळा, अहिल्यानगरची गो धाम गोशाळा, मुंबईची देवता कला केंद्र, जळगावची सातपुडा परिसर आदिवासी विकास संघ आणि नाशिक येथून गोकुळधाम गो सेवा प्रतिष्ठान या गोशाळांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**